# योजनांच्या माहितीची दिनदर्शिका

आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती ग्रामिण व दुर्गम भागातील आदिवासी जनतेपर्यंत पोहचत नसल्याची बाब निदर्शनास आल्याने माहिती व प्रसिदधी अंतर्गत विभागातील योजनांची माहिती दर्शविणारी दिनदर्शिका प्रसिदध करण्यात आली. या दिनदर्शिकेत एकुण 27 योजनांची माहिती असुन सदर दिनदर्शिका ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय व इतर स्थानिक सार्वजनिक कार्यालये यांना प्रकल्प अधिकारी यांच्या मार्फत वाटण्यात आली आहे. यामुळे सर्वसामान्य आदिवासी पर्यंत विभागाच्या योजनांची माहिती मिळण्यास मदत होत आहे.



